# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
ईमेल: pgadmis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

---

संदर्भ: शै.प्रवेश/ ६६१२ दिनांक :– १३.९.२०१३

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / संस्था,

विषय:– शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मधील नोंदणी शुल्क, संगणक शुल्क, व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा **कॉलेज कोडसह** पाठविणेबाबत....

महोदय/ महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मधील आपल्या महाविद्यालयातील/ मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रं. PGS/542 dtd 17/2/2011 नुसार बुधवार दि. ३१ ऑक्टोबरपूर्वी विद्यापीठास पाठवावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१. प्रथम वर्षापासून नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या फी मधील विद्यापीठ हिस्सा सोबतच्या दरपत्रकानुसार पाठवावा.

२. बी.बी.ए. व बी.सी.ए. व बी.बी.एम. अभ्यासक्रमाची फी व्यावसायीक दरानुसार पाठवावी.

३. धनाकर्ष पाठविताना महाविद्यालयाच्या लेटरहेडवर विद्यापीठाचा संलग्नता क्रमांक व कॉलेज कोड असणे आवश्यक आहे. धनाकर्षाच्या मागील बाजूस महाविद्यालयाचे नाव, रकमेचा तपशिल ( उदा. विकास निधी, संगणक शुल्क ) इत्यादी बाबी नमूद कराव्यात अन्यथा धनाकर्ष परत पाठवण्यात येईल.

४. शैक्षणिक वर्ष व अभ्यासक्रमाची वर्षनिहाय विद्यार्थी संख्या पत्रात नमूद करावी व सोबतच्या दरपत्रकावर फक्त एकूण विद्यार्थी संख्या लिहावी.

५. एकाच वेळेस सर्व अभ्यासक्रमाचे (पदवी व पदव्युत्तर ) शुल्क पाठवावे. नोंदणी शुल्क (पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी), संगणक शुल्क व विकास निधी प्रवेश दिलेल्या प्रत्येक वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून स्वीकारण्यात यावे.

६. इतर कोणत्याही निधीचे शुल्क या निधीमध्ये समाविष्ट करु नये.

७. धनाकर्ष पाठविताना कमिशनची रक्कम निधीच्या रकमेतून वजा करु नये.

८. परदेशी/ सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्रं. आयएससी/१०५० व १०५०–A, दिनांक ९ जून २००८ नुसार पाठवावा.

९. महाविद्यालयाने नाव बदलले असल्यास जुने नावही पत्रामध्ये नमूद करावे. तसेच नावाची दुरुस्ती डाटा प्रोसेसिंग युनिट यांचेकडील यादीतही करावी.

१०. धनाकर्ष पावतीबाबत त्रुटी असल्यास त्याच वर्षात त्याची पूर्तता करावी. पावती एकत्रित हवी किंवा स्वतंत्र याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

११. मागील वर्षाचा वरील निधीतील हिस्सा पाठवला नसल्यास सध्याच्या शै.वर्षाच्या धनाकर्षासह स्वतंत्रपणे पाठवावा.

१२. वित्त विभागाचे धनाकर्षाबाबत परीपत्रक जा. क्र. ४९२४ दिनांक २०/३/२००६ चे परीपत्रक पहावे. त्यानुसार सर्व नियमांची पूर्तता करावी.

वरील सूचना विचारात घेऊन निधीतील विद्यापीठाचा हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत धनाकर्ष प्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

13/9/13

सहा.कुलसचिव

(शैक्षणिक प्रवेश )

# पुणे विद्यापीठ

**शै.वर्ष :२०१३–१४ मध्ये महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यी संख्येबाबत तक्ता.**

**महाविद्यालयाचे/ मान्यताप्राप्त संस्थेचे नांव व पत्ता :..........................................................(विद्यार्थ्यींचे यादीसह)**

**संलग्नता क्रमांक वर्ष :.................................... कॉलेज कोड नंबर :...................**

| | व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | | अव्यावसायिक अभ्यासक्रम | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | अभ्यासक्रमाचे नाव | शुल्काचा प्रकार | विद्यापीठास पाठवावयाच्या रकमेचा दर (प्रत्येकी) रू | एकुण विद्यार्थी संख्या | एकुण रक्कम रू. | अभ्यासक्रमाचे नाव | शुल्काचा प्रकार | विद्यापीठास पाठवावयाच्या रकमेचा दर (प्रत्येकी) रू | एकुण विद्यार्थी संख्या | एकुण रक्कम रू. |
| १. | | सर्व पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी नोंदणी शुल्क (११४ ०१७) | २५/– | | | | सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नोंदणी शुल्क (११४ ०१७) | २५/– | | |
| २. | | विकास निधी (१११ ०१२)<br>अ)पदवीपर्यत<br>ब)पदव्यूत्तर | <br><br>५०/–<br>५०/– | | | | विकास निधी (१११ ०१२)<br>अ)पदवीपर्यत<br>ब)पदव्यूत्तर | <br><br>२५/–<br>२५/– | | |
| ३. | | संगणक शुल्क (१११ ०११)<br>अ)पदवीपर्यन्त<br>ब)पदव्यूत्तर | <br><br>२०/–<br>२०/– | | | | संगणक शुल्क (१११ ०११)<br>अ)पदवीपर्यन्त<br>ब)पदव्यूत्तर | <br><br>५/–<br>५/– | | |

संदर्भ: प्रवेश / , दिनांक / /२०

दूरध्वनी क्रमांक : २५६०१२६०

प्राचार्यांची सही व शिक्का